सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ६२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २७ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## 'बटेंगे तो कटेंगे' चा नारा देणारे आता 'सौगात' वाटणार

## ठाकरेंचा भाजपवर हल्लाबोल






**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७नागपूर–** केंद्रातील भाजप सरकारने अल्पसंख्याकांच्या मदतीसाठी 'सौगत–ए–मोदी' नावाने एक नवीन मोहीम सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत भाजपचे कार्यकर्ते देशभरातील मुस्लिम समुदायातील लोकांमध्ये जाऊन त्यांना 'सौगत–ए–मोदी' किट देतील. ईदीच्या निमित्ताने या किटचे वाटप केले जाईल. सौगात–ए–मोदींचे सर्वात मोठे लक्ष बिहार विधानसभा निवडणुकांवर आहे. मात्र यावरुनच उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. भाजपने आता हिंदुत्व सोडून टाकल्याची घोषणा करावी असं उद्धव ठाकरे म्हणाले.

शिवसेनेला मुस्लीम समाजाने मोठ्या प्रमाणावर मतदान केलं. मुस्लीम समाज शिवसेनेवर विश्वास ठेवून आमच्यासोबत आल्यानंतर यांचे डोळे पांढरे झाले होते. त्यांनी लगेच म्हटलं की उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडलं. आता मला एका गोष्टीचे समाधान आहे की इथे जे बोंबलत फिरत होते त्यांना पाचर बसली आहे. कारण ईदच्या निमित्ताने सौगात ए मोदी हा कार्यक्रम भाजपने हाती घेतला आहे. ३५ लाख मुस्लीम कुटुंबियांच्या घरी जाऊन भाजप कार्यकर्ते त्यांना सौगात ए मोदी देणार आहेत. हे सौगात ए मोदी नाही तर सौगात ए सत्ता आहे. सत्तेसाठी हे कोणत्याही थराला जाऊ शकतात त्याचे हे एक उदाहरण आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीमध्ये बटेंगे तो कटेंगे अशी घोषणा देणारे आता भेट द्यायला चालले आहेत. आयुष्यभर मुस्लीम समाजाच्या नावाने शिमगा करायचा आणि निवडणूक आल्यावर त्यांना पुरणपोळी द्यायची असा हा प्रकार आहे. याच्यात एक गोष्ट चांगली आहे. आमच्याकडचे जे काही उडाणटप्पू आहेत ते टोपी घालून कशी सौगात घेऊन जातात ते मला बघायचं आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

मला चिंता एकाच गोष्टीची आहे. पंतप्रधान मोदी लोकसभेच्या निवडणुकीत बोलले होते की मंगळसूत्र चोरलं जाणार. पण आता हिंदुंच्या मंगळसुत्राचे रक्षण कोण करणार? कोणी आहे का हिंदुत्ववादी पक्ष? हीच भूमिका तुमची कायम राहणार आहे की निवडणुकीपूरती? सौगात ए सत्ता ही बिहारच्या निवडणुकीपूरती राहणार आहे की नंतरही राहणार आहे हे भाजपने जाहीर करावं, असं आवाहन उद्धव ठाकरेंनी केलं.भाजपने आता घोषणा करायला हवी की त्यांनी हिंदुत्व सोडून टाकलं. इतके वर्षे त्यांनी हिंदू मुस्लीमांमध्ये भांडणे लावली. काही जणांच्या घरावर बुलडोझर चालवले. त्यांच्या घरी सौगात घेऊन कोण जाणार हे सुद्धा त्यांनी जाहीर करावं, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

## भाजप मुस्लिम-ख्रिश्चनविरोधात नाही

## देशहिताचा विचार करणारे आमच्यासाठी हिंदूच -बावनकुळे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७नागपूर–** शिवसेना (उठाबा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर केलेल्या टीकेला प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. भाजप मुस्लिम–ख्रिश्चनविरोधात नाही, देशहिताचा विचार करणारे आमच्यासाठी हिंदूच आहेत. मात्र उद्धव ठाकरे यांच्या रॅलीत पाकिस्तानचे झेंडे कसे फडकले याचे उत्तर त्यांनी द्यायला हवे, असे बावनकुळे म्हणाले.ते नागपुरात गुरुवारी प्रसारमाध्यमांशी बोलत होते.सध्या रमजान ईदचा महिना सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रमजान ईदसंदर्भात शुभेच्छा दिल्या आहेत. पक्षाच्या मुस्लिम मोर्चा व मायनॉरिटी युनिटकडून ईदमिलन, इफ्तारचे आयोजन करण्यात येत आहे. भाजप मुस्लिम किंवा ख्रिश्चनविरोधी नाहीत. देशासाठी विचार करणारा प्रत्येक व्यक्ती आमच्यासाठी हिंदू आहे. देशातील प्रत्येक नागरिक आमच्यासाठी सारखाच आहे. अनेक मुस्लिम लोकप्रतिनिधी भाजपचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यांचा पक्षात सन्मान होतच आहे. मात्र देशात राहून पाकिस्तानचे गोडवे गाणारे व झेंडा घेऊन रॅली काढणाऱ्या लोकांना आम्ही विरोध करणारच. उद्धव ठाकरेंनी मतांसाठी राजकारण केले आहे. त्यांच्या रॅलीत पाकिस्तानचे झेंडे दिसले होते. त्यांनी त्यांना का थांबविले नाही असा सवाल बावनकुळेंनी उपस्थित केला.उद्धव ठाकरेंना पुढील भविष्य दिसत नाही. त्यामुळे एकनाथ शिंदेना डिवचले तर ते दूर जातील व आपल्याला जागा मिळेल असे त्यांना वाटते. मात्र असे काहीही होणार नाही. उद्धव ठाकरे यांनी स्वतःच्या पक्षाला वाढविण्यासाठी काम केले पाहिजे. रोज त्यांचा पक्ष तुटतो आहे. जर त्यांनी पक्षासाठी वेळ दिला नाही तर पक्षच वाचणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींवर बोलण्यापेक्षा उद्धव ठाकरे यांनी त्यांचे बूथपातळीवर पक्ष कार्यकर्ते पक्ष का सोडत आहेत त्याकडे लक्ष दिले पाहिजे, असे बावनकुळे म्हणाले

## सरकारचे अपयश लपविण्यासाठी नागपुरात धार्मिक भावना भडकविली

### काँग्रेसच्या सत्यशोधन समितीचा आरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७नागपूर :–** नागपुरातील दंगलप्रकरणी प्रदेश काँग्रेसने स्थापन केलेल्या सत्यशोधन समितीने आपला अहवाल बुधवारी प्रदेश काँग्रेसला दिला. मुस्लिम धर्मीयांना उद्रेकित करण्याच्या हेतूनेच धार्मिक भावना भडकविण्यात आली. राज्य सरकारच्या इशाऱ्यावरून विहिंप, बजरंग दल व भाजपने पूर्वनियोजित पद्धतीने हे घडवून आणले, असा आरोपवजा ठपका या अहवालात ठेवण्यात आला आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिती स्थापन केली होती. ठाकरे यांच्यासह माजी खासदार हुसैन दलवाई यांनी दंगलग्रस्त भागातील नागरिकांशी चर्चा केली. यानंतर सत्यशोधन समितीने बुधवारी प्रदेशाध्यक्षांकडे अहवाल सादर केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुरस्कृत विश्व हिंदू परिषद व बजरंग या संघटनांना पुढे करून आंदोलन पेटविण्याचा प्रयत्न झाला आणि त्यामागे दोन धर्मामध्ये तेढ निर्माण व्हावी, धार्मिक ध्रुवीकरण व्हावे, असा हेतू होता, असा आरोप समितीने अहवालात केला आहे.

औरंगजेबाची कबर ३०० वर्षापेक्षा अधिक काळापासून या राज्यात आहे. या आधी कधीही हा मुद्दा नव्हता. मात्र, सरकारचे अपयश झाकण्यासाठी हा मुद्दा उकरून काढण्यात आला. मागील काही दिवसांपासून धार्मिक तेढ निर्माण होईल, अशी वक्तव्ये सरकारमधील मंत्रीच करीत होते. पण त्यावर काहीच कारवाई होत नव्हती. मुस्लिमविरोधी ध्रुवीकरण करण्याच्या हेतूने हे सर्व केले जात होते. राहुल सोलापूरकर व प्रशांत कोरटकर या संघाच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराजांबद्दल केलेल्या वक्तव्याने राज्यभर पडसाद उमटले. यावरून लक्ष वळविण्यासाठी औरंगजेबाविरुद्ध मोहीम हाती घेण्यात आली. मात्र, या आंदोलनाला प्रतिसाद मिळत नसल्याचे लक्षात आल्यावर थेट मुस्लिम समाजाच्या आस्थेवरच हल्ला करण्यात आला, असा आरोपही अहवालात करण्यात आला आहे.या घटनेच्या माध्यमातून उत्तर प्रदेश, गुजरातच्या धर्तीवर धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्या माध्यमातून सरकारचे अपयश झाकण्याचा प्रयत्न झाला, असेही समितीने अहवालात नमूद केले आहे.

## संतोष देशमुखांच्या हत्येची तीन आरोपींची कबुली

### 'आका'च्या चेल्यांनी सांगितलं सत्य..





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७बीड–** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घुणपणे हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात आता एक मोठी अपडेट मिळाली आहे. वाल्मिक कराडच्या टोळीतील तिघा जणांनी संतोष देशमुख यांची हत्या आपणच केल्याची कबुली पोलिसांकडे दिली आहे. आरोपींच्या या कबुलीमुळे वाल्मिक कराडचा पाय आणखी खोलात गेला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सुदर्शन घुले, जयराम चाटे आणि महेश केदार या तिघांनी पोलीस चौकशीत हत्येची कबुली दिली आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात पोलिसांनी वाल्मिक कराडसह त्याच्या चेल्यांना अटक केली होती. या प्रकरणातील आणखी एक आरोपी कृष्णा आंधळे मात्र अजूनही फरार आहे. त्याचा पोलिसांकडून कसून शोध घेतला जात आहे. मात्र अजून तरी तो पोलिसांच्य हाती लागलेला नाही.

संतोष देशमुख यांचं ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करण्यात आलं होतं. यामध्ये सुदर्शन घुले, जयराम चाटे, महेश केदार, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे हे आरोपी होते. या टोळीचा म्होरक्या सुदर्शन घुले याने पोलीस कस्टडीत जबाब दिला आहे. सुदर्शन घुले सुरुवातीला या हत्या प्रकरणातील आपला सहभाग नाकारत होता. नंतर पोलिसांनी त्याला आवादा कंपनीच्या मॅनेजरकडून खंडणी मागतानाचा व्हिडिओ दाखवला. यानंतर मात्र त्याने बोलण्यास सुरुवात केली. सुदर्शन घुलेने आम्हीच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन खून केला अशी कबुली पोलिसांना दिली.

**■ म्हणून संतोष देशमुखांची हत्या झाली**

सुदर्शन घुलेने पोलिसांना सांगितले की मयत संतोष देशमुख यांनी सुद्धा आम्हाला मारहाण केली होती. आमचा अपमान केला होता. त्यादिवशी आमच्या मित्राचा वाढदिवस होता तेव्हाच संतोष देशमुख यांनी आम्हाला मारहाण केली. मारहाणीचे व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करत आम्हाला आव्हान दिले होते. संतोष देशमुख यांच्या या कृतीचा आम्हाला राग आला होता म्हणून आम्ही त्यांना मारण्याचा प्लॅन आखला होता, असे घुले याने सांगितले.

## दिशा सालियनच्या मृत्यूमागे सेलिब्रेटींचे ड्रग्ज रॅकेट,

### शिंदे गटाच्या नेत्याचा खळबळजनक दावा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७मुंबई–** दिशा सालियन हत्येमागे मुंबईतील सेलिब्रेटींचे ड्रग्ज रॅकेट आहे. सतीश सालियन यांनी नव्याने केलेले आरोप गंभीर असून त्यांच्या तक्रारीवर लवकरच मालवणी पोलीस ठाण्यात 'एफआयआर' नोंदवला जाईल, असा गौप्यस्फोट शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी आज केला. दिशा सालियन हत्याकांडात उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांची मोठी भूमिका असल्याचे पुरावे आहेत, असा दावा संजय निरुपम यांनी पत्रकार परिषदेत केला.

निरुपम म्हणाले की, सतीश सालियन यांनी मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे दिशा सालियन प्रकरणात तक्रार केली आहे. या तक्रारीत ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. ही तक्रार मालवणी पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर करण्यासाठी पुढे पाठवण्यात आली आहे. दिशा सालियनची ८ जून २०२० मध्ये मृत्यू झाला होता. दिशा सालियनचा मृत्यू संशयास्पद होता. या दिवशी दिशा सालियनच्या घरी झालेल्या पार्टीमध्ये सर्वजण उपस्थित होते, अशी चर्चा त्या दिवशी झाली होती, असे निरुपम म्हणाले.राज्य सरकारने या प्रकरणी एसआयटीची स्थापना केली असून त्याकडून चौकशी सुरू आहे. दिशा सालियनचा पोस्टमार्टम अहवाल तीन दिवस उशीराने प्राप्त झाला. तिचा मृतदेह हा इमारतीपासून २५ फूट लांब आढळून आला. तिच्या शरिरावर कोणत्याही जखमा नव्हत्या. या सगळ्या गोष्टी संशयास्पद असून त्याची नव्याने सखोल चौकशी होणे आवश्यक आहे, असे निरुपम म्हणाले.आदित्य ठाकरे यांनी सुप्रीम कोर्टात सीबीआयने क्लिनचीट दिल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले. मात्र सीबीआयने दिशा सालियन प्रकरणाचा नाही तर सुशांत सिंग हत्येचा तपास केला होता. आदित्य यांच्या खोट्या प्रतिज्ञापत्रावर देखील कारवाई होईल, असे निरुपम म्हणाले. या प्रकरणी आदित्य ठाकरे, सूरज पांचोली, दिनो मोरिया आणि इतरांवर संशय आहे. हे सर्व ड्रग्ज रॅकेटशी संबधित असून त्यांना ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्या समीर खान याने नार्कोटिस ब्युरोकडे कबुली दिली होती.

## तीव्र उष्णतेच्या लाटांमुळे केंद्र सरकार अलर्टमोडवर, सर्व राज्यांना पत्र लिहिलं

### उष्माघाता विषयीचा ॲक्शन प्लॅनवर भर देण्याचे दिले निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७नवी दिल्ली** देशभरात एकीकडे वाढता उष्मा चिंतेचं कारण ठरत आहे. हवामान विभागाने यंदाचा उन्हाळा अधिक असेल असा अलर्ट दिल्यानंतर देशभर तीव्र उष्णतेचे इशारे देण्यात येत आहेत. आता देशासह राज्यभरात तापमान झपाट्यानं वाढू लागलंय. दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारही अलर्ट मोडवर आले आहे. केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाने या संदर्भात राज्यांना पत्र लिहून सतर्क केले आहे.

वाढत्या तापमानामुळे लोक उष्माघाताला बळी पडू शकतात. त्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामांना रोखण्यासाठी देखरेख करण्यासाठी आरोग्य सुविधांची प्रभावी तयारी करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात मार्गदर्शक कागदपत्रे सर्व जिल्ह्यांना प्रसारित करण्याची विनंतीही करण्यात आली आहे. उष्णतेच्या परिणामांच्या क्शन प्लॅनवर भर

उष्णतेच्या लाटेसंबंधित आरोग्यविषयक परिणाम टाळण्यासाठी आणि परिस्थिती हाताळण्यासाठी मार्गदर्शक सूचना जिल्हा स्तरावर पोहोचवाव्यात. तसेच, राष्ट्रीय हवामान बदल आणि मानव आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत वर्च्युअल ट्रेनिंग सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे, जे आरोग्य तज्ञांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी राज्यांनी घ्यावी. असे केंद्र सरकारने राज्यांना निर्देश देण्यात आले आहेत.

हवामान विभागाने पुढील ३–४ दिवसांसाठी हीटवेवचा इशारा दिला आहे, अशी माहिती केंद्र सरकारने दिली आहे. त्यामुळे राज्य, जिल्हा आणि शहर पातळीवर आरोग्य विभागाने 'हीट–हेल्थ ॲक्शन प्लान' प्रभावीपणे राबवावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. उष्णतेच्या लाटांचा सामना करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने इतर आपत्ती व्यवस्थापन संस्था आणि आरोग्य विभागाच्या समन्वयाने उपाययोजना कराव्यात, तसेच उष्णतेच्या परिणामांचे व्यवस्थापन आणि आकलन करण्यावर भर द्यावा असंही केंद्र सरकारने पत्राद्वारे सूचवले आहे.

**■ उष्णतेच्या लाटेचा धोका वाढला**

हवामान विभागाच्या अहवालानुसार, मार्च २०२५ मध्ये देशातील बहुतांश भागांत तापमान सामान्यपेक्षा अधिक राहिले आहे. मार्च ते मे २०२५ या कालावधीत, ईशान्य भारत, सुदूर उत्तर भारत आणि दक्षिण–पश्चिम भाग वगळता, देशातील बहुतेक ठिकाणी तीव्र उष्णतेच्या लाटा जाणवण्याची शक्यता आहे. मध्य भारत, उत्तर–पश्चिम भारत आणि पूर्व भारतातील काही भागांमध्येही तापमानाचा ताण अधिक जाणवेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

## संपादकीय ......

# बीड अजूनही बेलगाम

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर चर्चेत आलेल्या बीड जिल्ह्यात कर्तव्यकठोर पोलिस अधिकारी नेमून राजकीय आणि सामाजिक दहशतवादाला लगाम घातला जाईल आणि सर्वसामान्यांना भयमुक्त वातावरणात जगता येईल, अशी सर्वांचीच अपेक्षा होती; मात्र रोज घडणार्या गुन्हेगारी घटनांमुळे विशेषत: केज आणि गेवराई तालुक्यात कायदा आणि सुव्यवस्थेला अजूनही जुमानले जात नाही, हे स्पष्ट होत चालले आहे.

दीड महिन्यापूर्वी बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलीच्या शोधाची मागणी घेऊन गेलेल्या माऊलीला पोलिस ठाण्यातच अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा इशारा (२० मार्च) द्यावा लागतो. संतोष देशमुख हत्याकांडामुळे प्रकाशझोतात आलेल्या आवादा कंपनीतून पाच लाखांची केबल चोरली (१९ मार्च) जाते. केज तालुक्यातील सहावीत शिकणार्या मुलाचे अंबाजोगाईतून अपहरण (१७ मार्च) केले जाते. अंबाजोगाई–केज महामार्गावर मोटारसायकल अडवून लाख रुपये लुटले (१८ मार्च) जातात. धूलिवंदनानिमित्त देण्यात आलेल्या जेवणाच्या कार्यक्रमात गावठी पिस्तुलातून हवेत गोळीबार (१८ मार्च) केला जातो. या आणि अशा अनेक घटना रोज घडतच आहेत.खंडणीसाठी दमदाट्या केल्याचा, संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा मास्टरमाईंड असल्याचा आरोप असलेला वाल्मीक कराड आणि त्याचे बगलबच्चे, वन्यजीवांची शिकार, तरुणाला बेदम मारहाण केल्याचा आरोप असलेला खोक्या याच्यासारखे कुख्यात गुंड जेलमध्ये आहेत; पण त्यांना आदर्श मानणारे काही चेले अजूनही बाहेर आहेत. तेच या जिल्ह्यात दहशत माजवत आहेत. चोर्या आणि इतर वैयक्तिक गुन्ह्यांची तर मोजदादच नाही. एक जिल्हा किंवा त्यातील दोन–तीन तालुक्यांतील उपद्रवाचा बंदोबस्त करणे एवढे मोठे आव्हान आहे? पकडले गेलो तर खैर नाही, हा संदेश देण्यात पोलिस अपयशी ठरत आहेच, हाच याचा अर्थ. राजकीय कवच असल्याशिवाय गुन्हेगार मोकाट सुटत नाहीत; पण सर्वच नेते 'गुन्हेगारांना सोडणार नाही' अशी विधाने करीत आले आहेत. त्यामुळे पोलिसांवर दबाव नेमक कुणाचा आहे, हे सर्वसामान्यांना पडलेले कोडे आहे. मराठवाड्यातच नव्हे, तर राज्यभरात बदनाम झालेल्या जिल्ह्यातील 'क्राईम रेट' घटविण्याचे आव्हान पोलिसांपुढे आहे. ती त्यांची जबाबदारीही आहे. नातेवाईकांनीच अपहरण केलेली शाळकरी मुलगी दीड महिन्यानंतरही पोलिसांना सापडत नसावी, यावर विश्वास बसत नाही. जे पोलिस अधिकारी कागदोपत्री तपास करीत आहेत, त्यांना वरिष्ठांनी जाब विचारायला हवा. शस्त्र परवान्यांची तपासणी करताना विनापरवाना शस्त्रांचा शोध ज्यांना घेता आला नाही, अशा पोलिस ठाण्यांनाही जबाबदार धरले गेले पाहिजे. वाल्मीक कराड आणि खोक्या भोसले या गुंडांना पोलिस पायघड्या घालत असल्याच्या बातम्या येत आहेत. या बातम्यांचे खंडण करण्याऐवजी पोलिसांच्या चुकांवर पांघरूण घालण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत.परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या दीड वर्षापूर्वी झालेल्या खुनाच्या तपासात कोणतीही प्रगती झालेली नाही. नव्हे, पोलिसांनी तपास थंड बस्त्यातच टाकला होता; मात्र मुंडे यांच्या पत्नीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केल्यानंतर यंत्रणा हलली. गेल्या महिनाभरात या खुनाच्या तपासासाठी नेमण्यात आलेले अधिकारी तीनवेळा बदलण्यात आले आहेत. त्यामुळे या यंत्रणेवर विश्वास किती ठेवावा, हा प्रश्न उभा राहतो. सतत घडत असलेल्या गंभीर गुन्ह्यांमुळे बीडचे पोलिस दल संशयाच्या भोवर्यात आले आहे. धनंजय मुंडे यांचा राजीनामा आला, पालकमंत्रिपद उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आले, तरीही सुधारणा घडताना दिसत नाहीत. कोणाचाही मुलाहिजा न बाळगता लहान–मोठ्या गुंडांच्या मुसक्या आवळून, त्यांच्यावर कठोर कारवाया आणि कायद्याचा धाक निर्माण करून, हा संशय दूर केला पाहिजे.

# सरकीच्या दरवाढीचा परिणाम
# कापसाच्या दरात ३०० रुपयांनी वाढ

## ८० टक्के शेतकऱ्यांनी यापूर्वीच विकला कापूस, सध्याही हमीभावापेक्षा दर कमीच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि २७अमरावती –** स्थानिक बाजारात मागणी वाढल्याने सरकीच्या दरात क्विंटलमागे २०० ते ३०० रुपयांनी दरवाढ झालेली आहे. त्यामुळे कापसाचेही दर ७२५० ते ७५०० रुपयांवर पोहोचले आहेत. सध्या १५ ते २० टक्के शेतकऱ्यांनी दरवाढीच्या प्रतीक्षेत कापसाची साठवणूक केलेली आहे. सीसीआयद्वारा कापसाची खरेदी २४ मार्चपासून बंद करण्यात आली. ग्रेड कमी केल्याने सीसीआयचे दर हमीभावापेक्षा ७४२१ रुपये होते. यामध्ये



सरकीचे दर पूर्वी ३३०० रुपये क्विंटल होते ते २६ मार्चला ३७५० रुपये क्विंटलपर्यंत पोहोचले आहेत. उन्हाळ्यात सरकीच्या दरात काही प्रमाणात वाढ दरवर्षी होते. सोबत आंतरराष्ट्रीय घडामोडीचाहीफरक दरावर झाला आहे. त्यामुळे स्थानिक बाजारात कापसाची काही प्रमाणात दरवाढ झाली असली तरी पुन्हा दरवाढ होईल किंवा हेच दर कायम राहतील, याची शाश्वती नसल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. गतवर्षी सरासरीपेक्षा जास्त पावसाने कपाशीचे मोठे नुकसान झाले.

### गाठीचा दर ५१५० रुपयांवर

सरकीच्या दरात वाढ झालेली असली तरी रुईच्या दरात अद्याप वाढ झालेली नाही. सद्य:स्थितीत रुईचे दर ६५ सेंट पर पाऊंड आहे. तर गठाणचे दर (१७० किलो) ५१७० रुपयांवर आहे. रुपयाच्या तुलनेत डॉलरची दरवाढ, चीनच्या गारमेंट उत्पादनावर अमेरिकेने वाढविलेला टेरिफ यासह अन्य बाबींमुळे देशांतर्गत कापसाचे दर टिकून असल्याचे व्यापारी सूत्रांनी सांगितले.

# दोघांनी हात बांधून गळा चिरला; मृतदेह विहिरीत फेकला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि २७ दिग्रस –** मालवाहू तीनचाकी वाहन चालवून कुटुंबाला मदत करणाऱ्या युवकाचा मृतदेह विहिरीत आढळून आला. त्याचे हात बांधून गळा चिरून त्याला विहिरीत फेकण्यात आल्याचे दिसून आले. हा मृतदेह धानोरा येथील विलास शेलकर या शेतकऱ्याच्या विहिरीत मंगळवारी सकाळी सापडला. मयत मुफीद शेख हा २४ वर्षाचा होता, तो कुटुंबीयांसह दिग्रस येथे राहत होता. मुफीद मालवाहू ऑटो चालवून रेतीचा व्यवसाय करायचा. सोमवारी रात्री ८ वाजल्यापासून तो बेपत्ता होता. मुफीद गायब झाल्याचं कळताच कुटुंबीयांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला मात्र तो सापडला नाही अखेर मंगळवारी सकाळी धानोरा येथील शिवारात विहिरीमध्ये हात बांधून गळा चिरलेल्या अवस्थेत मृतदेह तरंगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी घटनास्थळी गेले. मृतदेहाची ओळख पटवून तो मुफीदचा असल्याचं स्पष्ट झाले. या प्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. नेमका कोणत्या कारणावरून मुफीदचा खून झाला याचा शोध घेऊन पोलीस आरोपीचा माग काढत होते.

तपासात पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून घटनाक्रम जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. मुफीदचा गळा चिरण्यासह मारेकऱ्यांनी त्याच्या डोक्यावर तसेच शरीराच्या इतर भागावरही चाकूने वार केल्याचे दिसून आले. विहिरीच्या परिसरात रक्त सांडलेले आहे. मुफीदची हत्या करून मृतदेह विहिरीत फेकण्यात आला असावा.

# उन्हाळी बाजरी, भुईमूंग, सूर्यफूल पिकाचे व्यवस्थापन कसे कराल? वाचा सविस्तर







# देशभरात यूपीआय सेवा ठप्प, ग्राहकांचा संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मुंबई –** देशातील विविध भागांत यूपीआय सेवा ठप्प झाली असून, लाखो नागरिकांना डिजिटल पेमेंट करण्यात अडचणी येत आहेत. अनेक यूपीआय युजर्सन तक्रार केली आहे की त्यांचे, पेमेंट फेल होत आहेत किंवा खूप संथ गतीने होत आहेत. विविध बँकांच्या ग्राहकांना यूपीआय द्वारे पैसे पाठवण्यात आणि ते प्राप्त करण्यात अडचणी येत आहेत. यूपीआय व्यवहारांशी संबंधित समस्यांबद्दल युजर्स सोशल मीडियावर त्यांच्या तक्रारी आणि संताप व्यक्त करत आहेत.

अनेक व्यापाऱ्यांनी सांगितले की, ग्राहकांना यूपीआय द्वारे पेमेंट करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे व्यवहारांवरही परिणाम होत आहे. ऑनलाइन शॉपिंग आणि ॲप्सवर पेमेंट फेल झाल्याच्या तक्रारी देखील आल्या आहेत. काही युजर्सनी तक्रार केली आहे की त्यांचे फोनपे, गुगल पे आणि पेटीएम सारखे ॲप्स योग्यरित्या काम करत नाहीत.आज यूपीआय पेमेंट फेल्युअरचा सर्वाधिक फटका गुगल पे च्या युजर्सना बसला आहे. गुगल पे च्या ७२ टक्के युजर्सनी याबाबत तक्रारी नोंदवल्या आहेत. त्यानंतर वेबसाइट ॲक्सेस १४% टक्के आणि ॲप्सशी संबंधित समस्या १४ टक्के आहेत. त्याचप्रमाणे, पेटीएमवरील ८६ टक्के तक्रारी पेमेंटशी संबंधित होत्या. दरम्यान, लॉगिन आणि खरेदीशी संबंधित समस्यांचे प्रमाण अनुक्रमे ९ टक्के आणि ६ टक्के होते.


बँकिंग ॲप्सवरही परिणाम

दरम्यान या समस्येचा फटका बँकिंग सेवांनाही बसला आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या युजर्सना ट्रन्झॅक्शन्स (४७%), मोबाइल बँकिंग (३७%) आणि ऑनलाइन बँकिंग (१६%) मध्ये अडचणी आल्या. एकूणच, यूपीआय सिस्टीमवरील ८४% तक्रारी पेमेंट फेल होण्याशी संबंधित होत्या.

सोशल मीडियावर युजर्सचा संताप

डाउनडिटेक्टरच्या मते, यूपीआय सेवेशी संबंधित या समस्या दुपारी उशिरा सुरू झाल्या असून, संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास तक्रारींमध्ये मोठी वाढ दिसून आली. सोशल मीडियावरील अनेक युजर्सनी पेमेंट फेल झाल्याच्या तक्रारी नोंदवल्या आहेत.युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस चालवणाऱ्या नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने अद्याप या समस्येच्या कारणांबद्दल कोणतेही अधिकृत माहिती दिलेली नाही.







## उन्हाळ्यात घामाच्या दुर्गंधीने कपड्यांनाही घाणेरडा वास येतो, इन्फेक्शनही होते! दुर्गंधी घालवणारे ६ उपाय पाहा..

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७अमरावती**

आरोग्यउन्हाळ्यामध्ये घाम तर प्रत्येकालाच येतो. ऊन्हाचे प्रमाण एवढे जास्त असते की घामाच्या धारा लागतात. कपडे तर भिजतातच, चेहर्यावरून घाम गळत असतो.पाठ संपूर्ण भिजून जाते. काहींच्या तर हाता–पायाच्या तळव्यांनाही भरपूर घाम येतो. घाम जरी प्रत्येकाला आला तरी, काहींच्या घामाला प्रचंड घाण वास येतो. आता आपण म्हणतो की, घाम आल्यावर वास तर येणारच. मात्र तुम्हाला माहिती आहे का? घामाला वास नसतोच. जेव्हा त्या घामाचे प्रमाण फारच अति असते आणि तो खाकेमध्ये, पोटऱ्यांपाशी, मांडीजवळ त्वचेमध्ये जिरतो. तेव्हा वास येतो आणि येणारा वास घामाचा नसून तयार झालेल्या बॅक्टेरीयाचा असतो.



क्लेवलॅण्ड क्लिनिक तसेच मायो क्लिनिक आदी साईट्सवर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, घामामध्ये काही खनिजे, पाणी आणि मीठ या तीनच गोष्टी असतात.त्यांना वास येत नाही. घाम आल्यावर बॅक्टेरीया प्रथिनांवर आणि शरीराच्या चरबीवर परिणाम करतात. त्या प्रक्रियेमुळे अस्थिर संयुगे तयार होतात आणि मग घाम आल्यावर वास येतो. त्यामुळे घाम पुसला तरी वास जात नाही. शरीरावर तयार झालेला बॅक्टेरीया गेला की मगच तो वास जातो. वास तर येतोच मात्र बॅक्टेरीया वाढल्यावर त्वचेला ॲलर्जीही होते. काही सोपे उपाय करून ही समस्या टाळता येते.

१. अंघोळीच्या पाण्यामध्ये ईडलिंबाची पाने टाकायची. थोडावेळ तशीच ठेवायची पाणी जरा हिरवट झाले की मग त्या पाण्याने अंघोळ करा. ईडलिंबाच्या पानांमध्ये अनेक औषधी गुण असतात. बॅक्टेरीया कमी करण्यासाठी ते फायदेशीर आहे. रोज शक्य नसल्यास आठवड्यातून ३ दिवस तरी अशा पाण्याने अंघोळ करा.

२. अंघोळीच्या वेळी लिंबाचा रस शरीराला लावा. लिंबामध्ये जीवनसत्त्व 'सी' असते. तसेच जिवाणू विषाणू मारण्यासाठी गरजेचे असणारे गुणधर्मही असतात. लिंबू त्वचेवर जरा चरचरु शकतो. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेऊन वापरा. ३. हळद अँण्टीबॅक्टेरीयल असते. हळदीचा लेप मांड्यांना तसेच खाकेमध्ये लावा. सुकेपर्यंत तसेच ठेवा. नंतर धुऊन टाका.

४. झोपण्याआधी अंगाला खोबरेल तेल लावायचे. तेलामुळे त्वचा मऊ पडते. तसेच त्वचेला खाज सुटत नाही. घामामुळे होणारी जळजळही होत नाही.

५ . रोज अंगाला पावडर लावा. मेडीकलमध्ये मिळणारी अँण्टीबॅक्टेरीयल पावडर वापरा. त्वचेवर रॅशही उठत नाही घामाचाही त्रास होत नाही.

६. . आपण वास घालवण्यासाठी सेंट वापरतो. त्यामध्ये असलेले रसायन बॅक्टेरीयामध्ये मिसळते आणि त्याचा त्वचेला आणखी त्रास होतो. त्यामुळे अवयव सतत पाण्याने साफ करा. कापडाने घाम पुसा सेंट वापरू नका.

# राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेसाठी स्वस्तिका पोळ हीची निवड

## राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७धामणगाव रेल्वे–** राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेसाठी येथील स्कूल ऑफ स्कॉलर्सची विद्यार्थिनी स्वस्तिका पोळ हीची निवड झाली असून राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

बेंगळुरू येथे ४ ते ७ एप्रिलदरम्यान होणाऱ्या महिलांच्या सिनिअर राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेसाठी येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स स्वस्तिका पोळ विद्यार्थिनी महाराष्ट्र डॉजबॉल संघात निवड झाली आहे. अमरावती सिनिअर महिलांचा डॉजबॉल संघ राज्यस्तरीय स्पर्धेत मागील काही वर्षांपासून सातत्याने जेतेपद मिळवत आला आहे. त्या संघातील गुणवान चारही खेळाडूंची यंदा राज्य संघात वर्णी लागली आहे.खेळाडूंचे अभिनंदन होत असून, त्यांनी आजवर केलेल्या कामगिरीची ही पावती असल्याच्या प्रतिक्रिया क्रीडा क्षेत्रात उमटत आहेत. महाराष्ट्र डॉजबॉल संघटनेचे महासचिव शिव छत्रपती पुरस्कार विजेते संघटक प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांच्या मार्गदर्शनात अनेक खेळाडू आजवर राज्य व राष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळले आहेत. महाराष्ट्र डॉजबॉल संघात निवड झालेल्या चारही खेळाडूंचे डॉ. वसंत लुंगे, डॉ. आर. सी. कपिल, डॉ. सुरेश विधले, मुख्याध्यापिका अर्चना लुंगे, डॉ. हरीश काळे, अशोक खंडारे यांनी अभिनंदन केले.



RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २७ मार्च २०२५ शहर/ग्रामिण





# बेलोरा विमानतळाचा ...न भूतो न भविष्यति, असा होणार उद्घाटन सोहळा

## बेलोरा विमानतळाच्या भव्य द्घाटन समारंभाची तयारी सुरू३००० पाहुण्यांसाठी भव्य पेंडॉल उभारण्यात येणार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी येण्याची शक्यता

### मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हजेरी लावणार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती** – बेलोरा विमानतळावर ३० मार्च रोजी ट्रायल उड्डाण होणार... पण, त्यानंतर उद्घाटन समारंभ कधी ? याबाबतची तारीख जाहीर केलेली नाही. मात्र अतिउच्च सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या समारंभाची भव्य-दिव्य जय्यत तयारी सुरु झाली आहे. याउद्घाटन समारंभाला पंतप्रधानही उपस्थित राहू शकतात, अशी शक्यता सूत्रांनी व्यक्त केली त्यांच्या आगमनाची अधिकृत घोषणा झालेली नसली तरी, या कार्यक्रमाच्या आयोजनाची तयारी ज्या पद्धतीने सुरू आहे ते पाहता अशी शक्यता नाकारता येत नाही. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री देखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

बेलोरा विमानतळ सुरू होण्याची उलटी गिनती सुरूझाली आहे हे उल्लेखनीय आहे. उच्चपदस्थ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानतळाच्या उद्घाटन समारंभाची तयारी सुरू झाली आहे. यासाठी, पंतप्रधान उपस्थित राहिलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा १० वर्षांचा अनुभव आहे, असा एक्सपर्ट लोकांसोबत संपर्क साधण्यात येत आहे. असलेल्या तज्ज्ञांशी एका भव्य समारंभाचे आयोजन करण्यासाठी संपर्क साधला जात आहे. न भूतो न भविष्यति... या नुसार कार्यक्रमाची तयारी सुरु झालेली आहे.

### व्हीव्हीआयपी पाहुण्यांसाठी रेड कार्पेट

उद्घाटन समारंभाला येणाऱ्या व्हीव्हीआयपी पाहुण्यांसाठी रेड कार्पेटची व्यवस्थाही केली जाईल. याशिवाय, सोहळा भव्य करण्यासाठी विविध ठिकाणी फुलांची सजावट



देखील केली जाणार आहे.

### ४० हजार चौरस फूट मंडप

उच्चपदस्थ सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उद्घाटन समारंभासाठी ४० हजार चौरस फूट जागेचा एक मंडप बांधला जाईल, जो घुमटाच्या स्वरूपात असेल. या पेंडॉलमध्ये प्रवेश करण्या साठी, व्हीव्हीआयपी, व्हीआयपी आणि आमंत्रित पाहुण्यांसाठी स्वतंत्र दरवाजे असतील.

### संस्कार भारती

### रांगोळी

कार्यक्रमासाठी संस्कार भारती यांनी साकारलेली रांगोळी देखील साकारण्यात येणार आहे. यासाठी रांगोळी एक्सपर्टसोबत संपर्क साधला जात आहे. उद्घाटन सोहळा भव्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

एक मोठा स्टेजउद्घाटन समारंभासाठी अंदाजे १००० चौरस फूटाचा एक मोठा स्टेज देखील बांधला जाईल.यासाठीची तयारीही मोठ्या प्रमाणात केली जात आहे. याशिवाय, पाहुण्यांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी हिरव्या जाळ्या तसेच कूलर इत्यादींची व्यवस्था देखील केली जाईल. स्टेजवर चढण्यासाठी पायऱ्या देखील बांधल्या जातील. स्टेजवर भव्य फुलांची सजावट देखील असेल.

### ५० व्हीव्हीआयपी आणि २० व्हीआयपी

बेलोरा विमानतळाचा उद्घाटन समारंभ मोठ्या प्रमाणातपार पाडण्यासाठी तयारी सुरूझाली आहे. या कार्यक्रमाला ३००० पाहुणे उपस्थित राहतील असे वृत्त आहे. यामध्ये ५०० व्हीव्हीआयपी आणि २० व्हीआयपी पाहुणे असतील.

### मुख्यमंत्र्यांचे स्वत: लक्ष

बेलोराविमानतळ सुरूकरण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खूप प्रयत्न केले आहेत हे उल्लेखनीय आहे. ते अमरावतीचे भाचे आहेत. म्हणूनच त्याचे या विमानतळाशी जवळचे नातेआहे. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: उद्घाटन समारंभाची काळजी घेत आहेत.

### अमरावती-इंदूर विमानाची ट्रायल

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० मार्च रोजी गुढीपाडव्याला अलायन्स एअरचे विमान अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून इंदूर विमानतळावर उड्डाण करेल. हे विमान इंदूर विमानतळाच्या धावपट्टीला स्पर्श करेल आणि बेलोरा विमानतळावर परत पोहोचेल. त्यानंतर किमान २ आठवड्यांत नियमित अमरावती-मुंबई विमानसेवा सुरू होईल.

# महावितरणच्या दामिनी पथकाचे थकबाकीदारांवर लक्ष्य

## अमरावती जिल्ह्यात ३६ कोटींची वसुली करण्यासाठी महिला अभियंत्यांचे पथक सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**– अमरावती जिल्ह्यातील वीज बिलाची थकबाकी वसूल करण्यासाठी महावितरणचे दामिनी पथक कंबर कसून सज्ज झाले आहे. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या पाच दिवसांत ३६ कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे.

दामिनी पथकात १० महिला अभियंते आणि कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्या मदतीला सुरक्षा रक्षक आणि तंत्रज्ञ देण्यात आले आहेत. मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील चारही विभागांत हे पथक कार्यरत आहे.

अमरावती शहर विभागातून १७ कोटी, अमरावती ग्रामीण विभागातून ६ कोटी, मोर्शी विभागातून ३ कोटी आणि अचलपूर विभागातून १० कोटी रुपयांची थकबाकी वसूल करायची आहे. दहा हजार रुपयांपेक्षा जास्त थकबाकी



असलेले ग्राहक आणि वसुलीस टाळाटाळ करणारे ग्राहक दामिनी पथकाच्या रडारवर आहेत.थकबाकीदार ग्राहकांकडून वीज मीटर जप्त करण्याची कारवाई केली जात आहे. कारवाईदरम्यान अडथळा आणल्यास गुन्हा दाखल करण्याचे आदेश पथकाला देण्यात आले आहेत. वीज चोरी आढळल्यास विद्युत कायद्यांतर्गत कारवाई केली जाईल.

बिलांसंबंधी तक्रारींचे निराकरण करण्यासाठी वरिष्ठ व्यवस्थापक विजय पचारे आणि व्यवस्थापक विकास बांबल यांच्या नेतृत्वाखाली लेखा विभाग तत्पर आहे. महावितरणने थकबाकीदार ग्राहकांना त्वरित बिल भरून कटू कारवाई टाळण्याचे आवाहन केले आहे.

# संस्कार भारतीच्या पाडवा पहाटचे यंदा रौप्य महोत्सवी वर्ष

## २५ वर्षांच्या कार्यक्रमांचे सिंहावलोकन; ३० मार्चला पहाटे ५ वाजता व्यंकटेश लॉनवर कार्यक्रम




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**– अमरावती शहराला वेगळी ओळख मिळवून देणाऱ्या संस्कार भारतीच्या 'पाडवा पहाट' कार्यक्रमाचे यंदा रौप्य महोत्सवी वर्ष आहे.

यानिमित्त गेल्या २५ वर्षांतील कार्यक्रमांचे सिंहावलोकन करण्यात येणार आहे. कार्यक्रम पहाटे ५ वाजता व्यंकटेश लॉन, मानसरोवरच्या मागे होणार आहे.

यंदाच्या कार्यक्रमात नृत्य, नाट्य, संगीत, नाट्यछटा आणि व्यंगात्मक टिप्पणीसह सद्य घडामोडींवरील भाष्य सादर केले जाणार आहे. भारतीय नूतन वर्षाचे स्वागत वर्षप्रतिपदेच्या पवित्र वातावरणात व्हावे या उद्देशाने संस्कार भारतीने या उपक्रमाची सुरुवात केली होती.

विदर्भ प्रांताच्या अध्यक्षा सूरमणी कमलताई भोंडे आणि जिल्हाध्यक्षा जयश्री वैष्णव यांच्या मते, गुढीपाडवा हेच आपले नववर्ष या संकल्पनेला समाजाने स्वीकारले आहे. अनेक सामाजिक संस्था आता नवे वर्ष गुढीपाडव्याला शोभायात्रा, रॅली आणि सांज पाडवा यांसारख्या कार्यक्रमांतून साजरे करत आहेत.

अमरावतीकर जनतेने या कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला असून तो लोकोत्सवाचे स्वरूप धारण करत आहे. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त कार्यकर्ते आणि कलावंत उत्साहाने तयारीला लागले असून अस्मिता विद्यामंदिर येथे जोरदार तयारी सुरू आहे.

# इटुकल्याला उन्हाचा 'झपका' नाही अंगणवाडी सकाळी ८ ला भरणार

**मबाकचा निर्णय :चिमुकल्यांना दिलासा**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती** मार्च महिन्यातच जिल्ह्यातसध्या कडक उन्हाच्या तीव्र झळा जावणू लागल्या आहेत. त्यामुळे ऊन लागण्याची शक्यता लक्षात घेता जिल्हाभरातील अंगणवाडी बालकांना केंद्र मंगळवार १ एप्रिलपासून सकाळी ७:४५ दुपारी १२:३० वाजेपर्यंत भरवण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाने दिले आहेत. त्यामुळे बालकांना पर्यायाने पालकांचाही त्रास कमी झाला आहे. जिल्ह्यात दोन हजार ५०० पेक्षा अधिक केंद्रे आहेत. याअंगणवाडी केंद्रांमार्फत लाभार्थी, गर्भवती माता, स्तनदा माता, तसेच ३ ते ६ वयोगटातील बालके, किशोरवयीन मुली आदींना शासनाच्या वेगवेगळ्या सुविधांचा लाभ दिला जातो. अंगणवाडी केंद्राचे कामकाज



किमान साईचार तास काम अपेक्षित असून, सध्याच्या स्थितीत उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता अंगणवाडी केंद्र सकाळी ८ ते दुपारी १२:३० वाजेपर्यंत सुरू ठेवण्यात यावे, याबाबतचे आदेश तसेच कामकाजाचे वेळापत्रक ठरवून दिले आहे. याबाबत महिला व बालविकास विभागाचे डेप्युटी सीईओविलास मरसाळे यांनी चौदाही तालुक्यांतील संबंधितांना आदेश पाठवले आहेत. यानुसार ३० जूनपर्यंत या वेळेप्रमाणे अंगणवाडी केंद्रे सुरू राहतील.

बॉक्सअस आह कामकाजाच दैनंदिन वेळापत्रक

पूर्व शिक्षण सकाळी ८:४५ ते ९ वाजेपर्यंत लाभार्थ्यांना सकाळचा नाश्ता वाटप, सकाळी ९ ते १०:४५ पर्यत पूर्व शालेय शिक्षण, सकाळी १०:४५ ते ११:४५ पूरक पोषण आहार वाटप करणे, ११:४५ ते १२:३० रेकॉर्ड लिहिणे, दुपारी १२:३० ते १ वाजेपर्यंत संदर्भ सेवा आणि गृहभेट दुपारी १ ते २ वाजेपर्यंत अंगणवाडी सेविकांना याप्रमाणे कामकाज करावे लागणार आहे. याबाबतचे वेळापत्रकही महिला व बालकल्याण विभागाने निश्चित करून दिले आहे.–

# श्री विठ्ठल रुख्माई संस्थान रेवसाची ३० कोटींची जमीन पुन्हा देवस्थानच्या नावावर होणार

## महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पुढाकाराने मिळाला ऐतिहासिक विजय

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२७ अमरावती**– श्री विठ्ठल रुख्माई संस्थान, रेवसा (ता. जि. अमरावती) यांच्या मालकीची तब्बल ३० कोटी रुपयांची मौल्यवान शेतजमीन अखेर देवस्थानच्या नावावर पुन्हा नोंदवली जाणार आहे. मंदिर महासंघाच्या प्रभावी पाठपुराव्यामुळे हा ऐतिहासिक विजय मिळाला आहे. महसूल कर्मचाऱ्यांच्या संगनमतातून हडप केलेली ही जमीन परत मिळाल्याने भक्तगणांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या ऐतिहासिक विजयाबाबत आयोजित पत्रकार परिषदेत मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप प्रमोद जयस्वाल यांनी माहिती दिली. यावेळी महासंघाचे जिल्हा संयोजक विनीत पाखोडे, हिंदू जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक निलेश टवलारे, अधिवक्ता अभिजीत बजाज संस्थानचे विश्वस्त राजेंद्र वाकोडे आणि हरीभाऊ वाकोडे, हरिदास मानवटकर, समितीचे सचिन वैद्य उपस्थित होते.



### भ्रष्टाचाराचा पर्दाफाश – IAS अधिकाऱ्याने दिला होता कडक निर्णय

मौजा रेवसा येथील गट क्र. १६५, क्षेत्रफळ ३ हेक्टर ६९ आर ही शेतजमीन श्री विठ्ठल रुख्माई संस्थानच्या मालकीची आहे. मात्र, ही जमीन हडप करण्याच्या उद्देशाने प्रदीप त्र्यंबकराव वाकोडे व प्रवीण त्र्यंबकराव वाकोडे यांनी तत्कालीन तहसीलदार संतोष काकडे यांच्यासमोर जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील संस्थानचे नाव कमी करून स्वत:च्या नावावर नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला. ०९ मे २०२२ रोजी तहसीलदार काकडे यांनी महसूल कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करून ७/१२ उताऱ्यातून संस्थानचे नाव कमी केले आणि वाकोडे बंधूंच्या नावावर बेकायदेशीर नोंद केली. या निर्णयाविरोधात राजेंद्र पद्माकर वाकोडे यांनी उपविभागीय अधिकारी अमरावती यांच्यासमोर अपील दाखल केले. अपील प्रकरणात वाकोडे बंधू आणि महसूल कर्मचाऱ्यांच्या संगनमताचा पर्दाफाश झाला. तहसिलदार काकडे यांनी पारीत केलेला आदेश हा आर्थिक लाभ घेण्याच्या दृष्टीनेच करुन घेतल्याचे स्पष्ट दिसून येत असल्याचे निष्कर्ष ख-ड अधिकारी रिचर्ड यंथन यांनी नोंदवून दि. ०१ ऑगस्ट २०२३ रोजी तहसीलदार काकडे यांचा आदेश रद्द केला. देवस्थान शेत जमिनीबाबत होणाऱ्या गैर प्रकरणात आळा घालून भ्रष्ट अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यासाठी राज्यात न्टी लँड ग्रँबीग कायद्याची आवश्यकता आहे व त्याची तरतुद राज्य शासनाने करावी यासाठी मंदिर महासंघाने शासनाला मागणी केलेली आहे.

### मंदिर महासंघाचा पाठपुरावा – देवस्थानच्या जमिन मालकीला संरक्षण

या आदेशामुळे महसूल विभागासाठी हा निर्णय गळफास ठरला. उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशावरील अपिल प्रकरणात अतिरिक्त जिल्हाधिकारी अमरावती यांनी प्रकरणाचा अधिक सखोल तपास करून पुन्हा सुनावणीचे निर्देश दिले. मंदिर महासंघाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार देवस्थानच्या हितासाठी तहसीलदारांना निवेदन दिले. या पाठपुराव्याला यश मिळाले आणि तहसीलदार विजय लोखंडे यांनी दि. २० मार्च २०२५ रोजी सावध भूमिका घेत संस्थानच्या बाजूने अंतिम निर्णय दिला.

# देशभरात यूपीआय सेवा ठप्प, ग्राहकांचा संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई–** देशातील विविध भागांत यूपीआय सेवा ठप्प झाली असून, लाखो नागरिकांना डिजिटल पेमेंट करण्यात अडचणी येत आहेत. अनेक यूपीआय युजर्सन तक्रार केली आहे की त्यांचे, पेमेंट फेल होत आहेत किंवा खूप संथ गतीने होत आहेत. विविध बँकांच्या ग्राहकांना यूपीआय द्वारे पैसे पाठवण्यात आणि ते प्राप्त करण्यात अडचणी येत आहेत. यूपीआय व्यवहारांशी संबंधित समस्यांबद्दल युजर्स सोशल मीडियावर त्यांच्या तक्रारी आणि संताप व्यक्त करत आहेत.



## सोशल मीडियावर युजर्सचा संताप

डाउनडिटेक्टरच्या मते, यूपीआय सेवेशी संबंधित या समस्या दुपारी उशिरा सुरू झाल्या असून, संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास तक्रारींमध्ये मोठी वाढ दिसून आली. सोशल मीडियावरील अनेक युजर्सनी पेमेंट फेल झाल्याच्या तक्रारी नोंदवल्या आहेत.युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस चालवणाऱ्या नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने अद्याप या समस्येच्या कारणांबद्दल कोणतेही अधिकृत माहिती दिलेली नाही.

अनेक व्यापाऱ्यांनी सांगितले की, ग्राहकांना यूपीआय द्वारे पेमेंट करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे व्यवहारांवरही परिणाम होत आहे. ऑनलाइन शॉपिंग आणि ॲप्सवर पेमेंट फेल झाल्याच्या तक्रारी देखील आल्या आहेत. काही युजर्सनी तक्रार केली आहे की त्यांचे फोनपे, गुगल पे आणि पेटीएम सारखे ॲप्स योग्यरित्या काम करत नाहीत.आज यूपीआय पेमेंट फेल्युअरचा सर्वाधिक फटका गुगल पे च्या युजर्सना बसला आहे. गुगल पे च्या ७२ टक्के युजर्सनी याबाबत तक्रारी नोंदवल्या आहेत. त्यानंतर वेबसाइट ॲक्सेस १४% टक्के आणि ॲप्सशी संबंधित समस्या १४ टक्के आहेत. त्याचप्रमाणे, पेटीएमवरील ८६ टक्के तक्रारी पेमेंटशी संबंधित होत्या. दरम्यान, लॉगिन आणि खरेदीशी संबंधित समस्यांचे प्रमाण अनुक्रमे ९ टक्के आणि ६ टक्के होते.

बँकिंग ॲप्सवरही परिणाम

दरम्यान या समस्येचा फटका बँकिंग सेवांनाही बसला आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या युजर्सना ट्रन्झॅक्शन्स (४७%), मोबाइल बँकिंग (३७%) आणि ऑनलाइन बँकिंग (१६%) मध्ये अडचणी आल्या. एकूणच, यूपीआय सिस्टीमवरील ८४% तक्रारी पेमेंट फेल होण्याशी संबंधित होत्या.

# संत्रा उत्पादक शेतकरी धडकले विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयावर !

## गारपिट विम्यापसून वंचित ठेवणाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्याची मागणी !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मोर्शी**
हवामानावर आधारित संत्रा पिकाचा गारपीट विमा काढून सुद्धा गारपिट विम्यापासून वंचित ठेवणाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना गारपिट वीम्यामध्ये सहभागी करून घ्यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके, ग्राम पंचायत सदस्य सचिन उमाळे, अतुल काकडे, मंगेश होले यांनी विभागीय कृषी सहसंचालक अमरावती, जिल्हा कृषी अधीक्षक यांच्या कार्यालयात धडक देऊन निवेदना द्वारे करण्यात आली.

मोर्शी तालुक्यातील प्रगतिशील संत्र उत्पादक शेतकरी रुपेश वाळके यांनी २०२४ – २०२५ करीता गारपीट विमा मोर्शी येथील भारतीय स्टेट बँक शाखा मोर्शी येथून नोव्हेंबर २०२४ मध्ये काढला असून त्याची प्रीमियम रक्कम त्यांच्या खात्यातून डेबिट केल्या गेली. नोव्हेंबर महिन्यापासून काढण्यात आलेल्या विम्याची दखल विमा कंपनीने घेतली नसल्यामुळे संत्र उत्पादक शेतकऱ्यांना गारपीट विम्याच्या मदतीपासून वंचित राहावे लागणार आहे. याबाबत शाखा व्यवस्थापक भारतीय स्पटेट बँक मोर्शी यांच्याकडून संत्रा उत्पादक शेतकरी रुपेश वाळके यांना पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये बँकेने गारपीट विम्याची प्रीमियम रकम डेबिट करून बँकेच्या पार्किंग अकाउंट मध्ये



जमा केलेली आहे. तरीही आज तीन महिने पेक्षा जास्त झालेले असून, आम्ही ईनशुरन्स कंपनी ला विचारल्यास त्यांनी काहीही सविस्तर उत्तर दिलेली नाही. त्यामुळे आम्ही ते प्रीमियम खातेदाराच्या खात्यात मध्ये वर्ग करत आहे त्याची कृपया नोंद घ्यावी. बँक कुठल्या प्रकारच्या गारपीट क्लेम साठी जबाबदार राहणार नाही, याची कृपया नोंद घावी अश्या प्रकारे बँकेने संत्रा उत्पादक शेतकरी रुपेश वाळके यांना पत्र व्यवहार केलेला असून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकडून गारपीट विम्याचे प्रीमियम भरून सुद्धा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना गारपीट विम्याच्या मदतीपासून वंचित ठेवणाऱ्यांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना गारपिट विम्यामध्ये ८ दिवसात सहभागी करून न घेतल्यास प्रशासनाच्या व विमा कंपनीच्या चुकीच्या धोरना विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रधान सचिव, कृषी आयुक्त, विभागीय कृषी सहसंचालक, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक, युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरनस कंपनी यांच्याकडे निवेदन देऊन करण्यात आली.

# विटाने भरलेल्या ट्रकची स्कूल व्हॅनला जबर धडक; १२ विद्यार्थी जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अकोला :** विटाने भरलेल्या भरधाव ट्रकने स्कूल व्हॅनला जबर धडक दिल्याची घटना बाळापूर-वाडेगाव मार्गावर बुधवारी दुपारी घडली. या धक्कादायक घटनेमध्ये तब्बल १२ विद्यार्थी जखमी झाले आहेत. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे संतप्त पालक व नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन करून वाहतूक रोखून धरली. पोलिसांनी आंदोलकांची समजूत काढून चौकशी सुरू केली आहे.बाळापूर तालुक्यातून विटांची अवजड वाहतूक केली जाते. बाळापूर-वाडेगाव मार्गावर विटांची वाहतूक करणाऱ्या भरधाव ट्रकने (क्र.एमएच ३० एल २९७७) गुरुकुल स्कूलच्या व्हॅनला (क्र.एमएच २८ सी ५९५४) जोरदार बुधवारी दुपारी धडक दिली. अपघातग्रस्त ट्रक पुढे जाऊन झाडाला धडकला. या अपघातात स्कूल व्हॅनमधील १२ विद्यार्थी जखमी झाले आहेत. दोन्ही वाहनचालक देखील जखमी झाले. या भीषण अपघातात स्कूल व्हॅनमधील पुढील भाग चक्काचूर झाला. विटांनी भरलेल्या ट्रकवरील चालकाचे नियंत्रण गेल्यामुळे हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. जखमी विद्यार्थ्यांना तत्काळ उपचारार्थ अकोल्यातील सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी रोष व्यक्त करून रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. विटांच्या अवजड वाहतुकीमुळे अपघात वाढले असून तत्काळ कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली. पोलिसांनी आंदोलकांची समजूत काढली. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आल्यावर पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली.

# बदली शिक्षक ठेवणे पडले महागात, महिला शिक्षिका निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७भोर –** नगरपालिकेच्या शाळेतील महिला शिक्षिका भारती मोरे यांनी स्वत: ऐवजी दुसरी महिला (बदली शिक्षक) मुलांना शिकविण्यासाठी ठेवली होती. सदर महिलेने कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी नगरपालिकेचे मुख्याधिकारी गजानन शिंदे व भोर नगरपालिका प्रशासन अधिकारी राजकुमार बामणे यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. बदली शिक्षक ठेवणे महिला शिक्षिकेला चांगलेच महागात पडले आहे.सदर प्रकरणाची माहिती मिळाल्यावर मुख्याधिकारी गजानन शिंदे अचानक शाळेला भेट दिली असता, ही घटना उघडकीस आली. मुख्याधिकाऱ्यांनी याबाबत संबंधित महिला शिक्षिकेला कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मुख्याधिकारी गजानन शिंदे यांनी सांगितले की, नगरपालिकेच्या महाराणा प्रताप शाळेवर गैरहजर असून, तिच्या जागेवर दुसरीच महिला विद्यार्थ्यांना शिकवत असल्याची तक्रार आली होती. त्यानुसार शुक्रवारी (दि. २१) दुपारी दोनच्या सुमारास शाळेस




भेट दिली. त्यावेळी संबंधित शिक्षिका ही गैरहजर होती आणि तिच्या जागेवर दुसरीच महिला विद्यार्थ्यांना शिक्षण देताना आढळून आली.

शिकवत असलेल्या बदली महिलेला संबंधित शिक्षिका पगार देत असल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित शिक्षिकेला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यांचा खुलासा आल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. संबंधित उपशिक्षिकेने नवीन महिलेला केव्हापासून शिकविण्यास ठेवले आहे? तिला किती पगार देण्यात येत होता? आणि विद्यार्थ्यांचे किती नुकसान केले विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्याचे काम करीत आहेत.

शहरात नगरपालिकेच्या तीन शाळा असून, विद्यार्थी संख्या २७१ आहे. त्यासाठी ११ शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, अशा प्रकारे शिक्षक जर शासनाची फसवणूक करीत आहेत. त्यामुळे २६ पासून नगर परिषद सेवेतून तात्पुरते निलंबित करण्यात येत आहे. तसेच पुढे असाही आदेश देण्यात येत आहे की, निलंबन कालावधीत भारती दीपक मोरे (उपशिक्षिका, महाराणा प्रताप नगर परिषद शाळा क्र.१) यांना निलंबन कालावधीतील मुख्यालय भोर नगर परिषद भोर हे राहील. भारती दीपक मोरे यांना परवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नसल्याचे मुख्याधिकारी गजानन शिंदे यांनी सांगितले.

# रवि राणा यांच्या पाठपुराव्याला यशआकोली वळण रस्ता पूर्ण होणार

## १६० कोटी रुपये खर्चाचा पर्यायी मार्ग मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७अमरावती –** नवसारी, लालखडी, तारखेडा, साईनगर पार्वतीनगर, आकोली, चमनगर या परिसरातील नागरिकासाठी १६० कोटी रुपयांचा पर्यायी मार्ग मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आ. रवि राणा यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले असून आकोली चमनगर वळण रस्ता पूर्ण होणार आहे.

आ. आकोली चमनगर वळण रस्ता चे पुढील काम पूर्णकरण्यासाठी मुख्यमंत्रीयांचे कडे पाठपुरावा करत होते. २५ मार्च२०२५रोजी नगर विकास मंत्रालयाने शासन निर्णय काढला आहे. अमरावती शहरातील नगर चमनगर येथील झोपडपट्टीधारकांना मनपा भूखंड देणे बाबत शासन निर्णय झाला. आ. रवी राणा हे ४६ सातत्याने आकोली वळण रस्ता पूर्ण व्हावायासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा करत होते. अमरावती शहर विकास योजनेमधील ६० मीटर अकोली रस्त्याने बाधित होणाऱ्या चमन नगर येथील झोपडपट्टीधारकांना



पर्याय भूखंड भाडेपट्ट्याने देणेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या आदेशान्वये नगर विकास विभागाने शासन निर्णय क्रमांक २४ पत्र क्रमांक १५४ नवीन २६ दिनांक २५ मधून रोज २५ रोजी निर्गमित केला. या निर्णयामुळे आता आकोलीवळणरस्ता पूर्ण होणार आहे –लालखडी, नवसारी, तारखेडा, चमननगर, आकोली, सांईनगर, पार्वतीनगर, या परिसरातील लोकांना वरील रस्ता पर्यायी मार्ग म्हणून सोय होणार आहे.

# अधिवेशन संपताच सरकारकडून विधिमंडळाच्या महत्त्वाच्या समित्यांचे प्रमुख जाहीर

## रवी राणा अन् सुनील शेळकेंवर महत्त्वाची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**
महाराष्ट्र विधानसभा २०२४-२५ या वर्षासाठी विधान मंडळाच्या विविध समित्या जाहीर करण्यात आल्या आहेत. अधिवेशन संपताच सरकारकडून विधिमंडळाच्या महत्त्वाच्या समित्यांचे प्रमुख जाहीर करण्यात आले आहेत. काल (बुधवारी) विधानसभा सदस्यांची विविध समितीवर नावांची नियुक्ती करण्यात आली आहे. अल्पसंख्याक कल्याण समितीवर अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार मुरजी पटेल यांची समिती प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. रोजगार हमी योजना समिती प्रमुख म्हणून सुनील शेळके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधान मंडळाच्या माजी सदस्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत संयुक्त समितीचे प्रमुख म्हणून अजित पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



**महाराष्ट्र विधिमंडळाच्या विविध समित्या आणि प्रमुख**

**अंदाज समितीचे**
अर्जुन खोतकर
**लोकलेखा समिती**
विजय वडेट्टीवार
**सार्वजनिक उपक्रम समिती**
राहुल कूल
**पंचायत राज समिती**
संतोष दानवे
**रोजगार हमी योजना समिती** – सुनील शेळके
उपविधान समिती
प्रतापराव पाटील चिखलीकर
**अनुसूचित जाती कल्याण समिती**–नारायण कुचे
**अनुसूचित जमाती कल्याण समिती** – दौलत दरोडा
**विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती**
सुहास कांदे
**महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती**
मोनिका राजळे
**इतर मागासवर्ग कल्याण समिती** – किसन कथोरे
अल्पसंख्यांक कल्याण समिती
मुरजी पटेल
मराठी भाषा समिती
आशुतोष काळे
**विधानसभेच्या समित्या**
**विशेषधिकार समिती**
नरेंद्र भोंडेकर
विनंती अर्ज समिती
अण्णा बनसोडे
आश्वासन समिती
रवी राणा
नियम समिती
राहुल नार्वेकर
सदस्य अनुपस्थिती समिती
किरण लहामटे
**अशासकीय विधेयके व ठराव समिती**
चंद्रदीप नरके
सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबत संयुक्त समिती
अजित पवार
विधान मंडळाच्या माजी सदस्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत संयुक्त समिती
अजित पवार
ग्रंथालय समिती
प्राध्यापक राम शिंदे
आमदार निवास व्यवस्था समिती
शिवेंद्रसिंहराजे भोसले
आहार व्यवस्था समिती
डॉक्टर बालाजी किनीकर
धर्मादाय खाजगी रुग्णालयाची तपासणी करणे समिती
डॉक्टर आशिष जयस्वाल
वातावरणीय बदल संदर्भातील संयुक्त समिती
राम शिंदे

# विरोधी पक्षनेता निवड न झाल्यानं भास्कर जाधव कडाडले; सत्तेचा माज, मस्ती डोक्यात गेलीय..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई –** ज्यांच्याकडे पाशवी बहुमत आहे. ज्यांना सत्तेची मस्ती, मुजोरी आहे त्यांच्याकडून लोकशाहीची इभ्रत राखणे, त्याची शान राखणे, लोकशाहीची सभ्यता राखणे, लोकशाहीचं संवर्धन करणे ही अपेक्षा नाही असं सांगत उद्धव ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव कडाडले आहे. विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदाची निवड न



झाल्याने जाधव यांनी सरकारवर हल्लाबोल केला.

भास्कर जाधव माध्यमांशी बोलत होते. त्यावेळी ते म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर माझा खूप मोठा विश्वास होता. ते संसदीय कार्यप्रणालीवर काम करणारे, प्रेम करणारे आहेत. आमची संख्या कमी जास्त विचार करणार नाही असं ते सातत्याने बोलत होते. विरोधी पक्षनेतेपदाबाबत ते सूतोवाच असतील असं मला वाटत होते. परंतु या लोकांचा संसदीय कार्यप्रणाली, घटनेवर विश्वास नाही. केवळ सत्तेचा माज आणि मस्ती यांच्याकडे आहे असं त्यांनी सांगितले.

# नागपूर दंगल : शासनाकडून नुकसान भरपाई

## ४ लाख ५० हजार रुपयांची अंशता मदत मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर–** नागपूरच्या महालभागात १७ मार्चच्या रात्री उसळलेल्या दंगलीत झालेल्या हानीच्या नुकसान भरपाईपोटी शासनाने बुधवारी ७ लाख १५ हजार रुपयाची मदत मंजूर केली आहे. १७ तारखेला रात्री झालेल्या हिंसाचारात दंगलग्रस्त भागातील एक घर आणि दुचाकी ,चारचाकी व क्रेन जाळण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालयाने याचे पंचनामे करून ७.१५ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता, त्याला राज्य शासनाने मंजुरी दिली असून त्याचा



जी.आर.काढला आहे. त्यानुसार १३ दुचाकी, ३९ चारचाकी, दोन ऑटो, दोन दुकाने, एक घर आगीमुळे अंशता जळाले होते.

११ दुचाकी, ४० चारचाकी व दोन क्रेन पूर्णपणे जळाल्या होत्या. घरासाठी २० हजार रुपये, दोन दुकांनासाठी प्रत्येकी दहा हजार प्रमाणे एकूण २० हजार, दोन ऑटोंना आठ हजार,अंशता व पूर्णता जळालेल्या एकूण २४ वाहनांसाठी ५९ हजार आणि ४० चारचाकी वाहनांना ५० हजार अशी एकूण ४ लाख ५० हजार रुपयांची अंशता मदत मंजूर करण्यात आली आहे.उर्वरित २ लाख ६० हजार असे एकूण ७ लाख १५ हजार रुपये मदत करण्यात येणार आहे.शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूरला आले होते. त्यांनी पोलीस आणि महसूल अधिकाऱ्यांची बैठक घेऊन दंगलीत झालेल्या नुकसानाचा आढावा घेतला होता व लवकरच भरपाईची रक्कम दिली जाईल, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार बुधवारी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. दंगलीमध्ये जखमी एका व्यक्तीला पाच हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे.

# पालकमंत्री बावनकुळेंचा उद्या कलेक्ट्रेटवर जनता दरबार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती –**पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा जनता दरबार शुक्रवार २८ मार्च रोजी दुपारी १२ वाजता



आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात पालकमंत्री श्री. बावनकुळे नागरिकांना भेटीसाठी उपलब्ध असतील. नागरिकांनी त्यांच्या तक्रारी, निवेदने सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तुरीच्या नाफेड नोंदणीसाठी १५ दिवसांची मुदतवाढ

## मुदतीत ८४१९ नोंदणी, १२९४ शेतकऱ्यांची खरेदी आता ९ एप्रिल डेडलाइन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७अमरावती** :हमीभावाने खरेदीसाठी आवश्यक नोंदणीला आता १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली जिल्ह्यातील २१ केंद्रांवर ९ एप्रिलपर्यंत नोंदणी होईल. त्या तुलनेत खरेदी मात्र १४ केंद्रांवरच होत असल्याने अडचणीतील शेतकऱ्यांना मार्केटमध्ये तुरीची बेभाव विक्री करावी लागत असल्याचे वास्तव आहे.हंगामात शेतमालाचे भाव पडतात, त्यामुळे शासनाद्वारा शेतमाल खरेदी करून शेतकऱ्यांना हमीभावाचे संरक्षण दिल्या जाते. या प्रक्रियेत तुरीची ऑनलाइन नोंदणी २४ जानेवारीपासून करण्यात आली. त्यानंतर मुदत २४ फेब्रुवारीला संपल्याने ३० दिवसांची मुदतवाढ देण्यात आली व या अवधीतही शेतकऱ्यांची नोंदणी बाकी असल्याने मुदतवाढीची मागणी शासनाकडे करण्यात आली होती.

### नऊ केंद्रांवर अद्याप खरेदी नाही

'व्हीसीएमएफ'च्या अमरावती, चांदूरबाजार, अंजनगाव सुर्जी, येवदा, कापूसतळणी, भातकुली तसेच 'डीएमओ'च्या धारणी, खल्लार व नेरपिंगळाई केंद्रांवर आतापर्यंत तुरीची खरेदी करण्यात आली. मात्र, खरेदी सुरू नसल्याने शेतकरी अडचणीत आले आहे. या शेतकऱ्यांनी तूर विक्रीसाठी कुठे जावे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

डीएमओची केंद्र : अचलपूर (जयसिंग), अचलपूर, चांदूररेल्वे, दर्यापूर, धारणी, खल्लार, नेरपिंगळाई, नांदगाव खंडेश्वर व तिवसा व्हीसीएमएफ : धामणगाव, मोर्शी, वरुड, अमरावती, चांदूरबाजार अंजनगाव सुर्जी, येवदा, कापूसतळणी, भातकुली, गणेशपूर, शिंगणापूर व बाभळी

## वलगाव सहकारी सोसायटी निवडणूक

# २०२५ मध्ये थेट ४५ वर्षानंतर विरुद्ध मध्ये बळीराजा पॅनल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

वलगाव येथील सहकारी सोसायटी मध्ये थेट ४५ वर्षापासून कार्यरत असलेली पॅनल हे एकूण ४५ वर्ष कारभार सांभाळला असून या कारवाला फेरबदल करत भ्रष्टाचार केल्याची माहिती पत्रकार परिषद वलगाव येथे बळीराजा पॅनल तर्फे देण्यात आली व प्रथमच विरोधामध्ये बळीराजा पॅनल उभा करून शेतकऱ्यांच्या अनेक समस्या घेऊन बळीराजा पॅनल हे मोठ्या जोरात शेतकरी उमेदवारी लढवीत असण्याची माहिती बळीराजा पॅनल तर्फे पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली अशा वेळेस मतदार यादी मध्ये असलेला घोळ व मृत्यू सुद्धा स्पष्टीकरण बळीराजा पॅनल ने केले असून येणाऱ्या काळात आम्ही शेतकऱ्यांच्या हिताची बाजू घेऊ असे घोषणापत्र सुद्धा बळीराजा पॅनल तर्फे प्रकाशित करण्यात आले व संत गोवर्धन दास बाबा यांच्या समाधी पाशी नारळ फोडून प्रचाराला सुरुवात करण्यात आली तसेच गावातील देवी व डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याचे पूजन करून या प्रचाराला मोठ्या जोरात प्रतिसाद मिळत या पॅनल तर्फे उमेदवारी मिळवण्याची घोषणा सुद्धा पत्रकार परिषदेमध्ये करण्यात आली तसेच या पॅनलचे चिन्ह छत्री याचे सुद्धा मोचन करून व घोषणापत्र जाहीर करण्यात आले अशावेळी गावातील मोठ्या प्रमाणात शेतकरी व पॅनलचे सर्व सभासद उपस्थित होते

# रमजान ईदः खरेदीसाठी आबालवृद्धांची लगबग, कपडे, पादत्राणांसह सुकामेव्यांची दुकाने गर्दीने फुलली

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२७अमरावती–** रमजान ईद अगदी जवळ आली आहे. त्यामुळे मुस्लीम बांधवांमध्ये तयारीची लगबग सुरू झाली आहे. शहरातही ईदचा बाजार सजला आहे. शेवया, घिवर, फेण्या, खजूर आणि तत्सम साहित्याची दुकाने मुख्य बाजार परिसरात सजली आहेत. मुस्लीम बांधव सहकुटुंब बाजारात जाऊन विविध प्रकारचे खाद्यपदार्थ खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहेत. शहरातील इतवारा, श्याम चौक, नवसारी, ट्रान्सपोर्ट नगर, हबीब नगर, पठाण चौक, शालिमार आदी परिसरात मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले.

मुस्लिम बांधवांकडून मोठ्या उत्साहात ईद साजरी केली जाते.



आबाल वृद्धांपर्यंत सर्वजण नवीन कपडे परिधान करत असतात. शिरखुर्मा या गोड पदार्थावर रोजाची सांगता होते. त्यानिमित्ताने मुस्लिम बांधवांकडून नवीन कपडे, शिर खुर्मासाठी लागणारे पदार्थ तसेच अन्य विविध प्रकारच्या खरेदीसाठी बाजारपेठेत विशेषतः कपड्यांच्या दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून येत आहे. दरम्यान, रमजान सुरू होताच बाजारपेठेत विविध खाद्यपदार्थ, साहित्य आणि सजावटीच्या वस्तूंनी दुकाने फुलल्याचे दिसून येते. महिनाभरापासून शीतपेय, सरबत, मिठाई आणि फळांच्या खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

रमजान ईदच्या निमित्ताने बाजार सजला असून, खरेदीही जोमात सुरु झाली आहे. त्यातही कपडे, पादत्राणे, इमिटेशन ज्वेलरी आदी वस्तूंची खरेदी केली जात आहे. यंदा बाजारात खरेदीची धूम असल्याचे व्यापारी सांगत आहेत.



अवघ्या पाच दिवसांवर रमजान ईद आली आहे. मुस्लिम बांधवांमध्ये रमजान ईदची उत्सुकता वाढली आहे. यामुळे मुस्लिम भाविकांत ईदच्या खरेदीसाठी बाजारपेठात महिला, युवतींची मोठी गर्दी दिसून येत आहे.पठाणी ड्रेसला सर्वाधिक पसंती रमजान ईदनिमित्त तयार आहे त्या कपड्यांपेक्षा यंदाही कुडता पायजमा यासह पारंपरिक पठाणी ड्रेस शिवून घेण्यास अधिक पसंती असल्याचे दिसत आहे. त्यासाठी कापड खरेदी करून आवर्जून ड्रेस शिवून घेतले जात आहेत. पारंपरिक कपड्यांबरोबरच फॉर्मल ड्रेसही शिवून घेण्याकडे कल आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतीत १३ हजार ६०९ प्रकरणांचा निपटारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती** अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय येथे नुकतेच राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एकूण १३ हजार ६०९ प्रकरणांचा निपटारा या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये करण्यात आला. राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, दिवाणी व फौजदारी प्रकरणे, बँकेचे प्रलंबित प्रकरणे, चेक न वटवल्याची प्रकरणे (निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट) भुसंपादन प्रकरणे, विवाहासंबंधी कायद्याचे दावे, बँकेचे तसेच दिवाणी आणि फौजदारी अपील व इतर दिवाणी प्रकरणे संबंधीत दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी लोकअदालती समक्ष ठेवण्यात आली होती. एकूण १३ हजार ६०९ प्रकरणांचा निपटारा या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये करण्यात आला. लोकअदालतीमध्ये ठेवलेल्या प्रकरणांची पूर्तता करण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात एकुण ४८ मंडळ (पॅनल)ची निर्मिती करण्यात आली होती. यामध्ये न्यायाधीश, अधिवक्तागण तसेच न्यायालयीन कर्मचारी यांचा समावेश होता. जिल्हा व सत्र न्यायालयात आयोजित प्रस्तुत लोकअदालतीला चांगला प्रतिसाद मिळाला. या लोक अदालतीमध्ये संपूर्ण जिल्ह्यातून २८ हजार ४१० दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ८ हजार ६०८ प्रकरणांचा तर एकुण १५ हजार ९१३ प्रलंबित प्रकरणांपैकी २ हजार ३७३ प्रकरणे अशा एकुण १० हजार ९८१ प्रकरणांचा यशस्वीरित्या निपटारा करण्यात आला. राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमांतून एकुण २३ कोटी ४९ लाख ४३ हजार ३२५ रूपये तडजोडीच्या रकमेच्या प्रकरणांचा न्यायनिवाडा झाला.

# संत गाडगेबाबांची दशसूत्री, ग्रामविकास विषयावर उद्या एक दिवसीय कार्यशाळा

## ग्रामपंचायतीकरिता असलेल्या विविध योजनाबाबत मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र आणि महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेच्या संयुक्त सहकायनि शुक्रवारी (दि. २८) सकाळी साडे दहा वाजता संत गाडगे बाबांची दशसूत्री व ग्रामविकास या विषयावर विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरियल रिसर्च सेंटर सभागृहात् एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी साडे दहा वाजता कार्यशाळेकरिता नोंदणी सुरु होईल. साडे अकरा वाजता जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते उद्घाटन होईल. उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी



अधिकारी संजीता महापात्रा, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. एम. मेटकर, डॉ. विद्या शर्मा व सामाजिक न्याय विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार उपस्थित राहतील.दुपारच्या सत्रात केंद्र व राज्य शासनाच्या ग्रामपंचायती करिता असलेल्या विविध योजना संदर्भात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची भूमिका या विषयावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालकप्रिती देशमुख, ग्रामपंचायतीच्या अडचणी व अपेक्षा या विषयावर विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (आस्थापना) संतोष कवडे व उपायुक्त (विकास) राजीव फडके हे मार्गदर्शन करतील. दुपारी साडे तीन वाजता समारोपीय सत्रात विविध ग्रामपंचायतीने केलेल्या कामाची चित्रफित, सरपंचांचे मनोगत, तसेच उपस्थितांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येईल. या कार्यशाळेला जास्तीत जास्त संख्येने संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे व महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन बोंडे यांनी केले आहे.

# रेल्वे स्थानकावर पिण्याचे पाणी घेणे जीवावर बेतले

## अहमदाबाद – नवजीवन एक्सप्रेसमध्ये चढतांना एकाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७धामणगाव रेल्वे** येथील रेल्वे स्थानकावर पिण्याचे पाणी घेण्यासाठी उतरलेल्या एका अडतीस वर्षीय इसमाचा चालत्या अहमदाबाद – नवजीवन एक्सप्रेसमध्येचढतांना मृत्यू झाल्याची घटना गुरुवारला (ता.२७) सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार असे की,भूपेंद्र मधुकर शहारे (३८) रा.दवडीपार बाजार भंडारा हे आपल्या रसवंतीची मशीन दुरुस्तीसाठी भाच्यासोबत अहमदाबाद येथे गेले होते.परतीचा प्रवास अहमदाबाद – नवजीवन एक्सप्रेसने करत होते.दरम्यान धामणगाव रेल्वे स्थानकावर पिण्याचे पाणी घेण्यासाठी अहमदाबाद – नवजीवन एक्सप्रेसमधून उतरले.पाणी घेतल्यावर गाडी सुरू झाली.चालत्या गाडीत बसत असतांना त्यांचा तोल गेल्याने गाडी खाली पडले व दोन्ही पाय कापले गेले असल्याची माहिती आहे.दरम्यान या घटनेची माहिती मिळताच उपस्थितांनी रुग्णवाहिकेला पाचारण केले.रुग्णवाहिकेत नेत असतांना त्यांचा मृत्यू झाला.या घटनेची माहिती बडनेरा रेल्वे पोलिसांना देण्यात आली.

# इलेक्ट्रिक बसचे चार्जिंग स्टेशन तयार; भाडे दरावरून घोडे अडले

## किमान २० दिवस ते एक महिना आणखी वेळ लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–** एसटीच्या तपोवन कार्यशाळेत १७ इलेक्ट्रिक एसटी बसेस एकाचवेळी चार्ज करता येतील, इतपत सुविधा निर्माण झाली आहे. आता केवळ इलेक्ट्रिक बसेस एसटी महामंडळ केव्हा पाठवणार याचीच प्रतिक्षा सुरू आहे. अमरावती एसटी विभागाने पहिल्या टप्प्यात २५ बसेस मागितल्या आहेत. मात्र, प्रति कि.मी.भाडे दर अद्याप निश्चित होत नसल्याने घोडे अडले आहे. येत्या काही दिवसांत यावर अंतिम शिक्कामोर्तब झाले की, त्यानंतर इलेक्ट्रिक बसेस एसटी डेपोत दाखल होतील, अशी माहिती एसटीच्या विभागीय नियंत्रक कार्यालयाद्वारे देण्यात आली.

तरीही इलेक्ट्रिक एसटी बसेस जिल्ह्यात दाखल होण्यास किमान २० दिवस ते एक महिन्याचा कालावधी लागू शकतो. चार्जिंग स्टेशनचे काम सुमारे ८ महिने रखडल्यामुळे नागपूर–अमरावती इलेक्ट्रिक बस सेवा सुरू झाली नाही. कारण ही बस एकदा चार्ज केल्यानंतर किमान २८० ते ३०० कि.मी.धावते. परंतु, अमरावती–नागपूर हे अंतर सुमारे १६० कि.मी.असल्याने नागपुरातून अमरावतीत आलेली इलेक्ट्रिक एसटी बस परत पाठवण्याआधी तिला चार्ज करावेच लागेल. तसेच इलेक्ट्रिक बसेस सुरू झाल्यानंतर या बसची अमरावतीहून नागपूरसाठी रात्रीची फेरीच ठेवावी लागेल. नागपुरात



पोहोचलेली बस रात्रभर चार्ज होऊन सकाळी निघेल. दिवसा इतर वेळी जर इलेक्ट्रिक बस नागपुरात पाठवली तर तिला चार्ज करण्यासाठी किमान ३ तास चालक, वाहकांना खोळंबून राहावे लागेल. त्यामुळे दिवसभरात एकच फेरी होईल. तसेच चालकाचाही वेळ वाया जाईल, अशी माहितीही विभागीय नियंत्रक कार्यालयाद्वारे देण्यात आली. बस ही एकदा चार्ज केल्यानंतर २८० ते ३०० कि.मी. धावते. त्याचप्रमाणे ही पूर्णत: एसी बस असल्यामुळे तिचे भाडे हे शिवशाहीसारखेच राहणार आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण बस चार्ज करण्यासाठी ३ तासांचा कालावधी लागतो. ते बघूनच फेऱ्यांचे नियोजन केले जाणार आहे. अमरावतीत चार्जिंग स्टेशन सुरू झाल्यानंतर जिल्ह्यात प्रथम अचलपूरपर्यंत प्रवासी फेरी सुरू केली जाणार आहे.

### लवकरच ई–बस सुरू केली जाणार

एसटीच्या तपोवन येथील कार्यशाळेत चार्जिंग स्टेशन तयार आहे. केवळ व्यवस्थापन इमारतीचे काम काहीसे शिल्लक आहे. ते पूर्ण झाले की, लगेच इलेक्ट्रिक एसटी बसेसची मागणी केली जाईल. त्या लवकरच मिळतील अशी अपेक्षा आहे.

**– नीलेश बेलसरे, विभागीय एसटी नियंत्रक.**

# अमरावती येथील शैलेश वानखडे यांचा भारत कॉन–२०२५ पुरस्काराने सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–**

शहरातील बांधकाम व्यावसायिक व क्रीडा महाराष्ट्राचे माजी उपाध्यक्ष शैलेश वानखडे यांना नुकतेच भारत कॉन–२०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालय आयुक्त रूप राशी यांच्या हस्ते सिने निर्देशक राम गोपाल वर्मा, सियारामचे मॅनेजिंग डायरेक्टर पवन पोद्दार, रेमंड लाइफस्टाईलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनुपमा दीक्षित, अमरावती मॅनेजमेंट असोसिएशन चे अध्यक्ष रणजीत



बंड, सचिव प्रिती डागा व कोऑर्डिनेटर मयुर झंवर यांच्या उपस्थितीत शैलेश वानखडे यांना सपत्नीक हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.व्यावसायिक असलेले शैलेश वानखडे अनेक सामाजिक संस्थांमध्ये विश्वस्त आहेत त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक व व्यावसायिक क्षेत्राची दखल घेत अमरावती मॅनेजमेंट असोसिएशनद्वारा भारत कॉन–२०२५ हा मानाचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. अमरावती शहराच्या बांधकाम क्षेत्रात नाविन्यपूर्ण व प्रत्येकाला परवडेल अशा घरांचे स्वप्न पूर्ण करण्याचा मानस असल्याचे शैलेश वानखडे यांनी यावेळी सांगितले.

# तळपत्या उन्हात पक्ष्यांसाठी जीवनदायी ठरतेय शाल्मली

## वृक्ष लागवड करून संरक्षण करण्याची पर्यावरण प्रेमींची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–** भर उन्हाळ्यात जेव्हा सर्वत्र पाणी आणि अन्नाचे दुर्भिक्ष असते. तेव्हा पक्षी अन्नपाणी शोधत असतात. मात्र त्यांना जेव्हा शाल्मली किंवा काटेसावरचे झाड दिसते. तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार राहत नाही. कारण हे झाड त्यांना अन्न आणि पाण्याची व्यवस्था करत असते. दरम्यान, समाजात या झाडांविषयी असणाऱ्या विविध श्रद्धा–अंधश्रद्धांमुळे वृक्षतोडीचे प्रमाण वाढून संवर्धनाची गरजही निर्माण झाली आहे.

सरत्या फाल्गुन महिन्याबरोबर उन्हाची लाहीलाही वाढू लागते. थंडीतली आपली कोवळी सोनेरी कात टाकून माघातले ऊन भट्टीतल्या आगीसारखे तापू लागते. दुपारी उन्हाच्या झळा सहन होत नाहीत आणि मातीच्या मडक्यात निवांत जाऊन झोपावेसे वाटावे अशा उष्ण वाफा वाहू लागतात. वृक्ष, कोरड्या, मातकट, तपकीरी आणि करड्या धुळकट रंगांनी निसर्ग भरून जातो. निष्पर्ण, सांगाडे झालेल्या, पानोपानी



झरलेल्या उदास झाडांकडे पाहवत नाही. विस्तीर्ण माळरानावर नजर पोचेल तिथपर्यंत ऊनच ऊन दिसू लागते. या उन्हापासून वाचायला कुठे तरी दूर दूर जावेसे वाटू लागते. मग तुम्ही कुठेतरी एकांत निवांत ठिकाणी जाण्याचे ठरवता. गावच्या मूळ घरी, एखाद्या थंड हवेच्या ठिकाणी, एखाद्या मित्राकडे.. तुम्ही कुठेही जा.. जंगलात, डोंगरकपारीत, रस्त्याच्या कडेला, शेताच्या बांधावर, वेशीवर, रस्त्यावर, रेल्वेच्या ट्रॅकवर, पायवाटेववर, कुंपणाच्या आपल्याला काटेसावर भेटतेच भेटते.

देशांत आढळणारी वनस्पती, ४० मीटर पर्यंत होते वाढ काटेसावर ही भारत, इंडोनेशिया, दक्षिण चीन, हाँगकाँग व तैवान या देशांत आढळणारी वनस्पती आहे. बॉम्बक्स सिबा हे तिचं शास्त्रीय. वीस ते चाळीस मीटर पर्यंत वाढणाऱ्या य झाडाला पांढऱ्या करड्या खोडावर अंगभर लहानमोठे शंकूच्या आकाराचे काटे असतात. म्हणूनच तिचं नाव काटेसावर. काटेसावरीला संस्कृत मध्ये तिच्या एकंदरीत देहबोलीला थोडेसे विजोडच असे शाल्मली नाव आहे.

विदर्भ प्रजासत्ताक